पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 05/12/2019 (गुरूवार)
(सायंकाळ)

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक 04/12/2019 रोजी मा. पोलिस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांच्या आदेशाने ऑल आउट मोहिम राबवित असतांना पो. स्टे. केळवद यांना मुखबिराद्वारे खबर मिळाली की, पांढुर्णा ते नागपूर जाणाऱ्या हायवे रोडनी एका महेन्द्रा झायलो क्र. एम एच–15/सी डी –5732 मध्ये अवैध्यरीत्या कतलीसाठी गौवंशाची वाहतुक केली जात आहे. अशा खबरे वरुन ठाणेदार श्री. सुरेश मट्टामी हे पो. स्टे. केळवद स्टाफसह पांढुर्णा रोड हायवे क्र. 47 वरील सावळी फाट्यावर नाकाबंदी केली असता रात्री 1:00 वा. दरम्यान एक महेन्द्रा झायलो क्र. एम एच 15/सीडी –5732 वाहन भरधाव वेगाने येतांना दिसला. त्याला थांबविण्याचा ईशारा दिला असता त्यातील चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन न थांबविता नागपूरच्या दिशेने भरधाव वेगाने चालवुन पळवु लागला. तेव्हा त्या वाहनाबाबत संशय आल्याने वाहनाचा पाठलाग केला असता सदर वाहन चालकाने त्याचे वाहन छत्रापुर गावालगदच्या तलावा जवळ वाहन सोडुन अंधराचा व जंगलाचा फायदा घेत पळुन गेला. दरम्यान महेन्द्रा झायलो क्र. एम एच–15/सी डी –5732 ची पाहणी केली असता सदर वाहनात एकुण 06 गाई गौवंश अत्यंत क्रुर व निर्दयतेने पाय व तोंड दोरीने बांधुन दिसले. एकुण 6 गाई गौवंश किमती 60,000/– रु., एक महेन्द्रा झायलो क्र. एम एच–15/सी डी –5732 किमती 5,00,000/–रुपये असा एकुण कि. 5,60,000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन केळवद अप क्र. 264/2019 कलम 11(1)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. 1960 सह कलम 5 (अ),9 महा. सरंक्षण अधिनीयम 1965 सहकलम 179,184 मो वा का 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि पंकज वाघोडे हे करीत अहेत.

सदरची कार्यवाही ही श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्रीमती मोनीका राऊत, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सुरेश मट्टामी, सफौ अमरदिप कामठे, पो हवा रामराव पवार, ना पो शी रविंद्र डोरले, पोशि अंकीत ठाकरे, होमगार्ड सैनीक प्रकाश ढोबळे, चापोहवा गुणेश्वर डाखोळे यांनी केली आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर  जिल्हा (ग्रामीण), नागपूर